– शास्त्रीय कारण संकल्पनेचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा
किंवा कारणाची शास्त्रीय संकल्पना विशद करा

कारण-कार्य तत्त्वास विगमनाचा तात्त्विक आधार असे म्हणतात. विश्वात घडणाऱ्या प्रत्येक घटनेस किंवा कार्यास कारण हे असतेच. विश्वात अशी कोणतीही घटना नाही की जिला कारण नाही. असा जो आपला विश्वास असतो, या विश्वासालाच कारणकार्याचे तत्त्व असे म्हणतात.

विश्वात जे काही घडते त्या प्रत्येकास कारण असलेच पाहिजे असा आपला ठाम विश्वास असतो. साधी मुंगी मरण पावली किंवा धरणी जरी दुभंगली तरी त्याला कारण असतेच असे आपण मानतो. विश्वातील कोणतीही घटना विनाकारण किंवा आकस्मिकपणे घडत नाही हे तत्त्व आपण अनिवार्यपणे स्वीकारलेले असते. म्हणून मानवी जीवनात कारण ही संकल्पना अतिशय महत्वाची आहे. मानवी जीवन म्हणजे 'जे हवे ते मिळवणे व जे नको त्याचा नाश करणे' यासाठी चाललेला प्रयत्न असतो. हा प्रयत्न शक्य व्हावा म्हणून आपण कोण-त्याही गोष्टींची कारणे शोधत असतो.

व्यवहारात कारण ही संकल्पना आपण आपल्या सोयीने किंवा चुकीच्या पद्धतीने स्वीकारत असतो. त्यामुळे आपले व्यवहार चालत असले तरी शास्त्रीय ज्ञान किंवा संशोधनातील कारण संकल्पना त्याहून भिन्न असते.

* शास्त्रीय कारण संकल्पना :

① कारण कार्य संबंध हा दोन घटनांमधील संबंध असतो:

सर्वसामान्यपणे आपण असे मानतो की कोणत्याही घटनेचे किंवा कार्याचे कारण भौतिक स्वरूपाचे असते, परंतू शास्त्रीय दृष्टीकोनातून कारण कार्याचा संबंध हा भौतिक किंवा वस्तू वस्तूतील संबंध नसून तो दोन घटनांमधील संबंध असतो. उदा- 'चंद्र हे समुद्राच्या भरती-ओहोटीचे कारण' किंवा 'विष हे माणसाच्या मृत्यूचे कारण' आहे असे आपण मानतो. परंतू शास्त्रीय दृष्टीने 'चंद्राने एका विशिष्ट स्थितीत येणे ही घटना भरती-ओहोटी या घटनेचे कारण असते. किंवा विषाने मानवी रक्तात भिनने ही घटना मृत्यू या घटनेचे कारण असते

② कारण पूर्ववर्ती घटना स्वरूपी असते – कारण कार्याचा संबंध हा दोन घटनांमधील संबंध असतो असे आपण पाहिले. परंतू प्रश्न असा आहे की, कोणती घटना ही कोण-त्या घटनेचे कारण असते? याला स्वाभाविक असे उत्तर

आहे की अगोदर घडणारी घटना ही नंतर घडणाऱ्या घटनेचे कारण असते. पूर्ववर्ती घटना ही अनुवर्ती घटनेचे कारण असते. काळाच्या ओघात कारण ही घटना पूर्वी घडते व कार्य ही घटना नंतर घडते. असे कधीही होत नाही की कार्य अगोदर घडले व कारण नंतर घडले. माणुस अगोदर मरण पावला व नंतर त्याने विषप्राशन केले असे कधीच होत नाही.

③ कारण नीयतपूर्ववर्ती घटना स्वरूपी असते :- कारण हे कार्याच्या पूर्ववर्ती असते हे आपण पाहिले. परंतू कारण हे नुसतेच पूर्ववर्ती असून चालत नाही. कारण कोणतीही कार्यरूपी घटना घडण्यापूर्वी अनेक घटना घडलेल्या असतात. त्या सर्वांना कारण मानता येत नाही. उदा. मी वर्गात येण्यापूर्वी शेजारच्या घरात गाय व्याली, देवळात आरती झाली, रेल्वे गेली, महाविद्यालयाची घंटा वाजली अशा अनेक घटना घडतात. तथापि या सर्व घटनांनामाझ्या वर्गात येण्याचे कारण मानता येत नाही. तर जी घटना मी वर्गात येण्यापूर्वी नियमीतपणे, नीयतपणे घडते तिलाच कारण मानता येते. मी वर्गात येण्यापूर्वी महाविद्यालयाची घंटा नियमीतपणे वाजते म्हणून तिला कारण मानता येते.

④ कारण निरूपाधिक असते : एखादी घटना केवळ कार्याच्या नीयतपूर्ववर्ती आहे म्हणून देखील तिला कारण मानता येत नाही. कारण तसे जर मानले तर दिवसाला रात्रीचे व रात्रीला दिवसाचे कारण मानावे लागेल. कित्येकदा केवळ योगायोगाने सुद्धा एखादी घटना कार्याच्या अगोदर येत असते. म्हणून शास्त्रीय दृष्टीकोनातून प्रत्येक नियतपूर्ववर्ती घटनेस कारण मानता येत नाही. दिवस आणि रात्र या घटना नियतपूर्ववर्ती असल्या तरी सोपाधिक आहेत. कारण दिवस आणि रात्र होण्यासाठी 'पृथ्वीने स्वतः भोवती फिरणे' ही उपाधी आवश्यक आहे. खरे कारण सोपाधिक न राहता निरूपाधिक राहते.

⑤ कारण हे पर्याप्त / पुरेसे असते – कोणतेही कार्य घडून घडून येण्यासाठी एखादे विशिष्ट कारण तर असतेच. परंतू त्याला जोडून येणाऱ्या घटकांचा देखील कारणात समावेश करावा ~~कारण~~ लागतो. उदा. परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी 'मन लावून अभ्यास करणे' हे मुख्य कारण आहे. परंतू त्यासाठी परीक्षा फॉर्म भरणे, नोट्स तयार करणे किंवा आजारी न पडणे अशा गोष्टींची देखील तेवढीच आवश्यकता असते. या सर्वांचे मिळून बनणारे कारणच पर्याप्त किंवा पुरेसे असते.

(६) कारण हे कार्याच्या समीप असते : कारण आणि कार्यात समीपता असावी लागते याचा अर्थ असा की, एखादे कारण उपस्थित झाले की लगेचच कार्य देखील निर्माण झाले पाहिजे. कारण आता उपस्थित झाले आणि बऱ्याच काळाने कार्य घडले असे होत नाही. उदा. शोभेच्या दारूच्या ढिगावर विस्तवाची ठिणगी पडली की लगेचच स्फोट झाला पाहिजे. असे कधीही होत नाही की ठिणगी आता पडली आणि आठ दिवसांनी स्फोट झाला. म्हणजेच कारण कार्यात समीपता असते.

वर प्रतिपादन केलेल्या वैशिष्ट्याने युक्त कारण संकल्पनेलाच शास्त्रीय कारण म्हणतात.

***

(*) लौकिक कारण संकल्पना :

शास्त्रीय कारण संकल्पना ही काही वैशिष्ट्यांनी युक्त असते. परंतू व्यवहारात मात्र आपण त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून आपल्याला सोयीची अशी कारण संकल्पना स्वीकारत असतो. तिलाच कारणाची लौकिक संकल्पना असे म्हणतात. ती पुढील प्रमाणे –

(१) काकतालीय न्याय – ज्या प्रमाणे कावळा फांदीवर बसला व फांदी मोडली तर आपण असे समजतो की कावळा फांदीवर बसल्याने फांदी मोडली. या न्यायाने आपण व्यवहारात अनेक गोष्टी स्वीकारत असतो. उदा- दिवा पडून विझणे व माणसाचा मृत्यू होणे, मांजर आडवे जाणे व परीक्षेत नापास होणे, रिकामी घागर आडवी येणे काम न होणे. असा आपण कारणकार्य संबंध जोडत असतो.

(२) कारण अनेकता : एकच कार्य अनेक कारणाने घडते असे स्वीकारणे म्हणजे कारण अनेकता होय. उदा- माणसाचा मृत्यू विषाने, बंदुकीच्या गोळीने, गळफासाने, पाण्यात बुडाल्याने वृद्धपकाळाने अशा अनेक कारणाने होतो असे आपण मानतो.

(३) कारण- कार्य व्यत्यास – या प्रकारात आपण कारणाला कार्य व कार्याला कारण समजत असतो. उदा. ग्रहण लागल्यामुळे चंद्र हा सूर्य व पृथ्वीच्या मधे आला असे समजणे म्हणजे कारणकार्य व्यत्यास होय.

(४) सहोदर कार्य : एका कारणापासून निरनिराळी कार्ये निर्माण होत असतात. तथापि मूळ कारणास सोडून आपण कार्यापैकी एकाला कारण व दुसऱ्यास कार्य समजतो. उदा. तासकाटा फिरण्याचे कारण मिनिटकाटा, किंवा मिनीटकाटा फिरण्याचे

कारण सेकेंदकाटा आहे असे आपण समजतो. परंतू या सर्वांचे मुख्य कारण घड्याळाला दिलेली चावी हे असते.

(५) **घटक उपाधी** – बरेचदा एखादे कार्य घडून येण्यासाठी कुठला तरी एक घटक कारणीभूत असतो. या बाबीकडे दुर्लक्ष करून आपण त्या संपूर्ण घटनेलाच कारण समजतो. उदा– मलेरियाची साथ फैलावण्यास विशिष्ट डास कारणीभूत असतात. याकडे दुर्लक्ष करून आपण असे मानतो की शहरातील घाणीच्या साम्राज्यामुळे मलेरियाचा प्रादुर्भाव झाला असावा.

वर प्रतिपादन केल्याप्रमाणे व्यवहारात अशा कारण संकल्पना आपण स्वीकारत असतो. आपली व्यावहारिक गरज त्यातून भागत असते. म्हणून त्यास कारणाची लौकिक संकल्पना म्हणतात.

# निसर्ग समरूपतेचे (एकविधतेचे) तत्त्व

निसर्ग समरुपता किंवा प्रकृति एकविधता हा विगमनाचा तात्त्विक आधार आहे. व्यवहारात किंवा शास्त्रीय संशोधनात आपल्याला काही गोष्टी गृहित धरुनच पुढे जावे लागते. निसर्गात घडणाऱ्या प्रत्येक घटनेस कारण असतेच असा आपला ठाम विश्वास असतो. त्यालाच कारणकार्याच्या तत्त्वावरचा विश्वास असे म्हणतात. याच्या सोबतच आपण आणखी एका तत्त्वावर विश्वास ठेवतो, त्या तत्त्वासच निसर्ग समरूपतेचे तत्त्व असें म्हणतात. 'विशिष्ट कारण जर उपस्थित झाले तर विशिष्टच कार्य घडते' असाहा आपला विश्वास असतो. त्यालाच निसर्गसमरूपतेच्या तत्त्वावरचा विश्वास असे म्हणतात.

आपण आपल्या व्यवहारात काही विशिष्ट प्रकारची विधाने करत असतो. ती पुढील प्रमाणे सांगता येतात -

1. निसर्गात नियमांचे साम्राज्य आहे. निसर्गातील प्रत्येक गोष्ट निसर्गाच्या नियमानुसारच घडते.
2. परिस्थिती जर सारखीच असेल तर परिणामदेखील सारखेच घडतात.
3. विशिष्ट कारण जर उपस्थित झाले तर विशिष्टच कार्य निर्माण होते.
4. अज्ञात घटना या ज्ञात घटनांसारख्याच असतात.
5. भविष्यकाळातील घटना या भूतकाळातील घटनांसारख्याच असतात.

अशा अनेक प्रकारची विधाने करून आपण निसर्ग समरूपतेच्या तत्त्वावरचा विश्वास व्यक्त करत असतो. हेच तत्त्व आपल्याला खालील उदाहरणांच्या सहाय्याने समजून घेता येते.

उदाहरण - १ :-

एक टेबल घेऊन त्यावर आपण एक विशिष्ट पूड पसरली. टेबलाच्या एका कडेला एक गोटी ठेवली. या गोटीला विशिष्ट पध्दतीने जर धक्का दिला. तर ती गोटी एका विशिष्ट मार्गाने जाऊन टेबलाच्या दुसऱ्या बाजूने विशिष्ट ठिकाणी पडेल. दुसऱ्या दिवशी तोच टेबल, तीच गोटी, तशीच पूड घेऊन त्या गोटीला तसाच धक्का दिला तर काय होईल? तर आपला असा पक्का विश्वास असतो की, आज ही ती गोटी त्याच मार्गाने जाईल आणि तशाच पध्दतीने त्याच विशिष्ट ठिकाणी पडेल.

उदाहरण- २-

समजा शेजाऱ्याच्या बागेतील काही फुलझाडे आपल्याला आवडली व तशीच फुलझाडे आपल्याही बागेत यावीत असे वाटले तर आपण काय करू? त्या शेजाऱ्याला फुलझाडासंदर्भातील सर्व माहिती विचारून तसा प्रयत्न आपल्याही बागेत करू. त्याने ज्या मोसमात रोप लावले, त्याच मोसमात आपणही लावू त्याने ज्या प्रकारचा खड्डा खोदला, अगदी तसाच आपणही खोदू त्याने जशी माती वापरली, तशी आपणही वापरू. त्याने वापरलेले खत आपणही वापरू, त्याच्यासारखे आपणही पाणी टाकू. एवढे सगळे केल्यानंतर आपला असा ठाम विश्वास असतो की आपल्याही बागेतील फुलझाडे तशीच येतील. समजा, ती तशी न येता जळून गेली तर आपण असे समजतो की आपलेच कुठे तरी चुकले असावे. आपण त्या तत्त्वावर अविश्वास दाखवत नाही.

वरील दोन उदाहरणांच्या सहाय्याने निसर्गसमरूपतेचे तत्त्व लक्षात येते. परंतू या ठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो की, मग जर असे घडत असेल तर सृष्टीत तोचतोचपणा भरला आहे काय? त्याच त्याच घटना परत परत घडतात का? याला असे उत्तर आहे की सृष्टीत तोच तोचपणा भरला नाही. प्रत्येक घटना जशीच्या तशी पुन्हा पुन्हा घडत नाही. निसर्गसम-रूपतेचा अर्थ एवढाच की निसर्गातील सर्व घटक किंवा गुणधर्म काही विशिष्ट नियमांनी बांधलेले आहेत. जेंव्हा एखादा घटक किंवा गुणधर्म उपस्थित होतो, तेंव्हा त्याच्याशी बांधला गेलेला घटक देखील उपस्थित होतो, एवढाच त्याचा अर्थ आहे. उदा- तहान लागणे - पाणी पिणे आणि तहान भागणे ही तीन घटक विशिष्ट नियमांनी बांधले आहेत. जेंव्हा पहिले दोन घटक उपस्थित होतात, तेंव्हा तिसराही घटक उपस्थित झालाच पाहिजे. तहान लागणे आणि पाणी पिणे हे दोन घटक उपस्थित झाल्यास 'तहान भागणे' हा घटकही उपस्थित झालाच पाहिजे. हाच समरूपतेचा अर्थ आहे.

* निसर्गसमरूपतेचे ज्ञान :-

या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित केला जातो की मानवास निसर्गसमरूपतेचे ज्ञान होते कसे? याला दोन प्रकारे उत्तर दिले जाते.

① बुद्धीवादी विचारवंतांच्या मते असे ज्ञान मानवाला त्याच्या आंतरिक प्रज्ञेतून होत असते. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी

निसर्गसमरूपतेचे ज्ञान जन्मजातच असते. असे ज्ञान मिळविण्यासाठी आपल्याला कोणतेही अनुभव घेण्याची आवश्यकता नाही.

(2) बहुतांशी अनुभववादी विचारवंताना वरील मत मान्य नाही. कारण त्यांच्यामते हे ज्ञान जर जन्मजात असते तर त्याचा प्रत्यय लहान मुले, अज्ञानी माणसे किंवा वेडी माणसे यांच्या ठिकाणी आला असता. परंतू प्रत्यक्षात तसे दिसत नाही. याचाच अर्थ निसर्गसमरूपतेचे ज्ञान आपल्याला अनुभवातून होत असते.

या दोन्ही विचारांचा समन्वय विकासवादाने केला. डार्विन व स्पेन्सर यांच्या मते अगदी सुरुवातीच्या काळात मानवाला हे ज्ञान अनुभवातून झाले. परंतू नंतरच्या काळात मात्र ते वंशसंक्रमणाच्या माध्यातून अंतस्फुर्तीने होते.

(*) निसर्गसमरूपतेचे (सातत्याचे) प्रकार:

शास्त्रज्ञांच्या मते निसर्गात दोन प्रकारची समरूपता (सातत्य) पहावयास मिळते.

(1) साहचर्य सातत्य - याचा अर्थ असा की निसर्गातील दोन घटक किंवा घटनांमध्ये साहचर्याचे सातत्य आढळते. साहचर्य म्हणजे एकाच्या सोबत दुसऱ्याने अनीवार्यपणे उपस्थित असणे. निसर्गात एखादी घटना घडली की तिच्यासोबतच दुसरीही घटना उपस्थित होतेच. उदा- साखरेने गोड असणे आणि ती स्फटीक स्वरूपात असणे हे एकाच वेळी घडत असते.

(2) क्रम सातत्य - याचा अर्थ असा की निसर्गातील दोन घटक किंवा घटनांमध्ये क्रमाचे सातत्य असते. निसर्गातील अनेक घटनांच्या संदर्भात असे होते की, एखादी घटना घडली की, लगेच क्रमाने दुसरीही घटना घडते. उदा- मीठ पाण्यात पडले की लगेचच ते विरघळण्यास सुरुवात होते.

***